# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

दूरध्वनी क्र. ०२४०-२४०३१०७

ई-मेल: election@bamu.ac.in, registrar@bamu.ac.in


## विद्यापीठ निवडणूक- २०२२

## जाहीर सूचना

### विविध अभ्यासमंडळावर करावयाच्या नामनिर्देशनाबाबत

सर्व संबंधितांना जाहीर सूचनेद्वारे कळविण्यात येते की, मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशानुसार अधिनियमातील तरतुदीनुसार विविध अभ्यासमंडळावर नामनिर्देशन करण्याची प्रक्रिया सुरू करावयाची आहे.

मा. कुलगुरू महोदयांनी संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून प्रत्येक अभ्यासमंडळावर सहा सदस्य नामनिर्देशित करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४० (२)(ख) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

**कलम ४० (२)(ख)- कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून, किमान दहा वर्षे अध्यापनाचा अनुभव असलेले पुढील प्रवर्गांमधून नामनिर्देशित केलेले सहा अध्यापक:-**

**(एक) संबंधित विषयातील विद्यापीठ विभागाच्या पूर्णवेळ अध्यापकांमधून एक अध्यापक;**

**(दोन) संबंधित विषयातील पदव्युत्तर अध्ययनक्रम देऊ करणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील किंवा पदव्युत्तर केंद्रांमधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापकांमधून दोन अध्यापक;**

**(तीन) संलग्न महाविद्यालये आणि मान्यताप्राप्त परिसंस्था यांमधील विभागप्रमुख नसलेले तीन अध्यापक;**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब दि. २९ एप्रिल, २०१७ अन्वये शासनाने विविध प्राधिकरणावर नामनिर्देशित करावयाच्या पात्रता व शर्ती जाहीर केल्या आहेत. त्यानुषंगाने अभ्यासमंडळावर नामनिर्देशित करावयाच्या व्यक्तींसंदर्भात पात्रता व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(एक)** | **कलम ४०(२)(ख)(एक) विद्यापीठ अध्यापक** | **कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेला-**<br>**(क) संबंधित विषयातील एकूण किमान १० वर्षांच्या अध्यापनाच्या अनुभवासह पीएच.डी. पदवीधारक असावा,**<br>**(ख) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.** |
| **(दोन)** | **कलम ४०(२)(ख)(दोन) संलग्न महाविद्यालयाचे पदव्युत्तर अध्यापक** | **कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-**<br>**(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,**<br>**(ख) एकूण किमान दहा वर्षाचा अध्यापनाचा अनुभव असावा,**<br>**(ग) संबंधित विषयातील पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकविणाऱ्या संलग्न महाविद्यालयांमधील किंवा मान्यताप्राप्त परिसंस्थांमधील अथवा पदव्युत्तर केंद्रामधील मान्यताप्राप्त पदव्युत्तर अध्यापक असावा,**<br>**(घ) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.** |

| | | |
|---|---|---|
| **(तीन)** | **कलम ४०(२)(ख)(तीन) संलग्न महाविद्यालयांतील अध्यापक (विभागप्रमुख नसलेले)** | **कुलगुरूने संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठात्याशी विचारविनिमय करून नामनिर्देशित केलेले-**<br>**(क) प्राचार्य म्हणून दि. १३ ऑक्टोबर २००० पूर्वी नियुक्त नसल्यास पीएच.डी. पदवीधारक असावा,**<br>**(ख) पदवीपूर्व स्तरावरील किमान १० वर्षांचा पदवीपूर्व अध्यापनाचा अनुभव असावा,**<br>**(ग) विद्यापीठाच्या परीक्षांशी संबंधित कामकाज एकूण किमान पाच वर्षे केलेले असावे.** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे पात्र असणाऱ्या इच्छुक व्यक्तींनी अर्ज करावेत.

नामनिर्देशन अर्ज विद्यापीठाच्या www.bamu.ac.in संकेतस्थळावरील University Election2022 या निवडणूक पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. नामनिर्देशन अर्ज सादर करण्यासाठी दि. १६-१२-२०२२ ते ३१-१२-२०२२ पर्यंत कालावधी निर्धारित करण्यात आला आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची हार्डकॉपी व सर्व संबंधित कागदपत्रे निवडणूक विभागास सादर करावीत.

**टीपः-** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ४० (२)(ख) तरतुदीनुसार, विविध अभ्यासमंडळावर नामनिर्देशन करण्यासंदर्भात प्रक्रिया राबविण्याचे तसेच नामनिर्देशन करण्याचे सर्वाधिकार हे मा. कुलगुरू महोदयांना प्राप्त आहेत. त्यामुळे नामनिर्देशनासंदर्भात अर्ज सादर केला या कारणास्तव अर्जदारास नामनिर्देशनाच्या जागेवर हक्क/ दावा करता येणार नाही. एखाद्या व्यक्तीने अर्ज सादर केला नसेल, परंतु सदरील व्यक्ती त्या पदासाठी योग्य व पात्र आहे अशी धारणा मा. कुलगुरू महोदयांची झाल्यास त्या व्यक्तीचे नामनिर्देशन करण्यात येईल. नामनिर्देशनाबाबत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याबाबत विद्यापीठाद्वारे कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा स्वीकारला जाणार नाही.

कृपया, सर्व संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

संदर्भ क्र. सा.प्र./निवडणूक/२०२२/833 )(
विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद )(
दिनांक- १५-१२-२०२२ )(

**I/c कुलसचिव तथा**
**निवडणूक निर्णय अधिकारी**